MHNG130010122021

Judge Code: MH03211

खटला दाखल तारीख : ३१/०८/२०२१.
खटला नोंदणी तारीख : ३१/०८/२०२१.
निकालाची तारीख : १४/०५/२०२६.
कालावधी : ०४ वर्ष ०८ महिने १४ दिवस

**भाग – अ**

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय रामटेक, जिल्हा नागपुर यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी श्रीमती ए. ए. शिरवळकर)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्रं. ५७४/२०२१** **निशाणी क्रमांक–३४.**

**(पोलीस स्टेशन – रामटेक येथील गुन्हा नोंद क्रं. १७०/२०२१ भारतीय दंड विधान, १८६० चे कलम १७० सहकलम ३४ अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| **सरकार पक्ष/फिर्यादी** | | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलीस स्टेशन, रामटेक,<br>ता.रामटेक, जि नागपुर. |
| **सादरकर्ते** | | सहायक सरकारी अभियोक्ता<br>श्रीमती विजया जगतापे |
| **आरोपी** | | **१] महेश श्रावण खंडाते**<br>वय – ३६ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>रा. मानेगावटेक, देवलापार, ता. रामटेक,<br>जि. नागपूर<br>**२] गणेश रामलुन मडावी**<br>वय – ५४ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>रा. मानेगावटेक, देवलापार, ता. रामटेक, |

| | | |
|---|---|---|
| | | जि. नागपूर<br>**३] मोहन दशरथ खंडाते**<br>वय – ४१ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>रा. बांद्रा, देवलापार, ता. रामटेक,<br>जि. नागपूर<br>**४] किशोर शिवप्रसाद वरखडे (मयत)**<br>**५] अब्दुल नईम खालील खान**<br>वय – ५३ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>रा. देवरी, जि. गोंदिया. |
| **सादरकर्ते** | | श्री. ए. जी. कारेमोरे |

## भाग – ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०४.०५.२०२१ |
| फिर्याद दाखल तारीख | ०५.०५.२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ३१.०८.२०२१ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | ०४.१०.२०२१ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ३०.०८.२०२२ |
| निकाल राखीव ठेवल्याची तारीख | .. |
| निकालाची तारीख | १४.०५.२०२६ |
| शिक्षा झाल्याची तारीख, शिक्षा झाली असेल तर. | .. |

| आरोपीचा अनु.**क्रं.** | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीन झाल्याची तारीख | कोणत्या गुन्हयाखाली दोषारोप ठेवले | शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्त | काय शिक्षा दिली | फौजदारी प्र.संहितेच्या कलम ४२८ साठी खटला सुरु असताना आरोपीचा |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | कारागृहातील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **महेश श्रावण खंडाते** | ०५.०५.२०२१ | ३१.०८.२०२१ | भारतीय दंड विधान, १८६० चे कलम १७० सहकलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त | .. | .. |
| २. | **गणेश रामलुन मडावी** | ०५.०५.२०२१ | ३१.०८.२०२१ | | | .. | .. |
| ३. | **मोहन दशरथ खंडाते** | ०५.०५.२०२१ | ३१.०८.२०२१ | | | .. | .. |
| ४. | **किशोर शिवप्रसाद वरखडे (मयत)** | .. | .. | | | .. | .. |
| ५. | **अब्दुल नईम खालील खान** | ०५.०५.२०२१ | ३१.०८.२०२१ | | | .. | .. |

## न्यायनिर्णय
## (घोषित तारीखः– १४ मे, २०२६)

आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधान, १८६० चे कलम १७० सहकलम ३४ अन्वये दंडनीय अपराधांकरीता खटला चालविण्यात आला आहे.

*अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालील प्रमाणे :–*

२) फिर्यादी संजय रमेश झाडे हे लोकप्रतिनिधी असल्यामुळे त्यांना त्याच्या परिसरातील ट्रकमालक व शेतकरी लोकांनी येऊन सांगितले की, आर.टी.ओ. चेक पोस्ट नाका कांद्री येथे काही खाजगी ईसम हे ट्रक चालक यांना थांबवून त्यांना आर.टी.ओ. चे कर्मचारी असल्याचे सांगून त्यांचेकडून पैसे घेत आहेत. त्यावरून त्यांनी दि. १७/०३/२०२१ रोजी आरोपींविरुद्ध रामटेक पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली. अशा माहितीवरून पोलीस स्टाफ, पंच व फिर्यादी असे मिळून कांद्री चेक पोस्ट येथे जाऊन पाहणी केली असता काही इसम कांद्री चेक पोस्टच्या आवारात चेक बुथच्या पुढे ट्रकला हात दाखवून थांबवू लागले. त्यावरून पोलीसांनी सदर ईसमांना ताब्यात घेतले व त्यांना त्यांचे नाव–गाव विचारून त्यांची अंगझडती घेतली. सदर आरोपींची अंगझडती घेतली असता नगदी एकूण रक्कम रू. २०,०२२/– व पाच मोबाईल असा एकूण मुद्देमाल रू. ४५,२००/– जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त करण्यात आला. सदर आरोपींपैकी कोणीही

आर.टी.ओ. चे नियुक्त कर्मचारी नसून ते स्वतःला आर.टी.ओ. विभागाचे कर्मचारी सांगून ट्रक चालक/क्लीनरकडून अवैधरित्या पैसे वसूल करत आहेत, असे तेथील थांबलेले ट्रक ड्रायव्हर यांनी सांगितले. सबब, आरोपींविरुद्ध कार्यवाही होणेस्तव रामटेक पोलीस स्टेशन येथे वरील आशयाची फिर्याद दाखल केली आहे.

३) फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी क्र. १ ते ५ विरुध्द गुन्हा रजिस्टर क्रमांक १७०/२०२१ रामटेक पोलीस ठाणे येथे नोंदविण्यात आला. सहा. पोलीस निरीक्षक दत्तप्रसाद शेंडगे यांनी दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा करून नगदी रू. २०,०२२/– व पाच मोबाईल असा एकूण मुद्देमाल रू. ४५,२००/– जप्त करण्यात आला. साक्षीदारांचे बयान नोंदविण्यात आले. आरोपींना अटक केली. त्यानंतर त्यांनी न्यायालयात आरोपींविरुद्ध दोषारोप पत्र दाखल केले.

४) माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी दिनांक ०४/१०/२०२१ रोजी आरोपी क्र. १ ते ५ हे न्यायालयात हजर झाल्यानंतर त्यांचे विरुध्द निशाणी क्र. ३४ अन्वये दोषारोप निश्चित केले. आरोपींनी गुन्हा नाकबुल केला व खटला चालविण्याची विनंती केली. आरोपी क्र. ४ याचा मृत्यु झाल्याने प्रकरण त्याचेविरुद्ध दि. ०९/०२/२०२६ च्या आदेशान्वये बंद करण्यात आले.

५) आरोपींविरुध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने साक्षीदार क्र. १ संजय राजुजी वाघमारे (घटनास्थळ पंच) निशाणी क्र. ३४ व साक्षीदार क्र. २ संजय रमेश झाडे (फिर्यादी) निशाणी क्र. ३४ वर तपासले आहे.

६) आरोपी क्र. १ ते ३ व ५ चे फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ चे कलम ३१३(१)(ब) अन्वये स्पष्टीकरण नोंदविण्यासाठी पुरेसा पुरावा न्यायालयाच्या पटलावर आलेला नाही. त्यामुळे आरोपींचे निवेदन नोंदविलेले नाही.

७) अभियोग पक्षातर्फे वकील श्रीमती विजया जगताप व आरोपी तर्फे वकील श्री. ए. जी. कारेमोरे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

८) अभियोगपक्षाने सादर केलेला पुरावा व आरोपींचा बचाव लक्षात घेता प्रस्तुत खटल्याचे न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात सदर मुद्दे, त्यावरील निष्कर्ष व कारणमिमांसा याप्रमाणेः–

| अ.क्र. | वाद मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, दिनांक ०४/०५/२०२१ रोजी २०.०० ते २२.०० वाजण्याच्या सुमारास आर.टी.ओ. चेक पोस्ट, कांद्री लगत सर्व आरोपींनी संगणमताने स्वतःला आर.टी.ओ. विभागाचे कर्मचारी असल्याचे बतावणी करून ट्रक चालकाकडून अवैधरित्या पैशाची वसुली करतांना मिळून आले व त्यामुळे त्यांनी भारतीय दंड विधान, १८६० चे कलम १७० सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला आहे ? | ..... नाही. |
| २) | काय आदेश ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे |

**अभियोग पक्ष निशाणी क्र. ३८ वरील घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील सही आणि निशाणी क्र. ३९ वरील तोंडी रिपोर्ट इ. कागदोपत्री पुराव्यावर विसंबुन आहे.**

## :: का र ण मि मां सा ::

**मुद्दा क्र. १ करीता** :–

९) आरोपींवर निशाणी क्र. ३४ वरील दोषारोप की, दिनांक ०४/०५/२०२१ रोजी आर.टी.ओ. चेक पोस्ट कांद्री येथे तुम्ही सर्व आरोपींनी संगणमत करून स्वतःला आर.टी.ओ. विभागाचे कर्मचारी असल्याचे बतावणी करून ट्रक चालकाकडून अवैधरित्या

पैशाची वसुली करतांना मिळून आले, हे सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने अभिलेखावरील साक्षीदार तपासले आहेत.

१०) अभियोग पक्षाच्या लेखी व तोंडी पुराव्यावरील चर्चेकरीता वळण्यापुर्वी मी याठिकाणी अभिलेखावर आलेला तोंडी पुरावा नमुद करीत आहे. अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. १ संजय राजुजी वाघमारे याने त्याच्या साक्षीत असे कथन केले आहे की, तो फिर्यादी व आरोपीला ओळखत नाही. दि. ४/५/२०२१ रोजी पोलीसांनी त्याला मनसर चौक येथील आर.टी.ओ. चेक पोस्ट जवळ पंच म्हणून बोलवले नव्हते. तो ॲम्बुलन्स घेऊन जात असतांना पोलीसांनी त्याची सही घेतली होती. पंचनाम्यामध्ये काय लिहिले होते याची त्याला माहिती नाही. सदर साक्षीदारास नि.क्र. ३८ वरील घटनास्थळ जप्ती पंचनामा दाखवला असता त्यावरील अनु.क्र. १ वर त्याची सही असल्याचे त्याने मान्य केले आहे. परंतु त्यातील मजकुराविषयी त्याला माहित नाही.

११) अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. २ संजय रमेश झाडे हा फिर्यादी असून त्याने त्याच्या साक्षीत असे कथन केले आहे की, तो आरोपींना ओळखत नसून त्यांना त्याने कधीही पाहिलेले नाही. त्याने चेकपोस्ट कांद्री नाका येथे अवैधरित्या पैशाची वसूली होत आहे, अशी नि.क्र. ३९ वरील तक्रार रामटेक पोलीस स्टेशनला दि. ०४/०५/२०२१ रोजी दिली होती. त्यावेळी तो पोलीस स्टेशनला होता. पोलीस कांद्री चेक पोस्टवर गेले व काही लोकांना पकडून आणले. त्यानंतर पोलीसांनी त्याची सही घेतली. पोलीसांनी कोणत्या लोकांना पकडून आणले होते, याची त्याला माहिती नसल्याचे तो सांगत आहे. दिनांक १७/०३/२०२१ रोजी त्यांनी रामटेक पोलीस स्टेशनला अशी तक्रार दिली होती की, काही लोकं कांद्री नाका येथे आर.टी.ओ. चे कर्मचारी आहेत असे सांगून अवैधरित्या लोकांकडुन पैशाची वसूली करीत आहेत, असे काही घडले नसल्याचे त्याने सांगितले आहे. साक्षीदार स्वतः सांगतो की, तो त्या लोकांबरोबर आर.टी.ओ.चे कर्मचारी आहेत असे सांगितले होते. अभियोग पक्षाने साक्षीदार क्र. १ व २ यांना उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परंतु, सदर साक्षीदारांनी त्यानंतर देखील अभियोग पक्षास साहाय्य

होईल, असे कोणतेही तथ्य अथवा कोणताही पुरावा अभिलेखावर आणता आला नाही. अभियोग पक्षाचा साक्षीदार यांच्या साक्षीतून घटनास्थळ जप्ती पंचनामा सिद्ध झालेला नाही तसेच फिर्यादीनेदेखील अभियोग पक्षास साहाय्य केलेले नाही.

१२) अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती विजया जगताप व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए. जी. कारेमोरे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकल्यानंतर मी अभिलेखावरील लेखी व तोंडी पुराव्यावरील चर्चेकरीता वळत आहे. निशाणी क्र. ३८ वरील घटनास्थळ जप्ती पंचनामा व निशाणी क्र. ३९ वरील तोंडी रिपोर्ट यातील मजकुर न्यायालयापुढे सिद्ध करण्यास अभियोग पक्षास अपयश आले आहे. साक्षीदार क्र. १ व २ हे सदर खटल्यात घटनास्थळ जप्ती पंचनाम्यावरील पंच व फिर्यादी म्हणून अभियोग पक्षाने तपासलेले आहेत. परंतु सदर साक्षीदार हे अभियोग पक्षास सहकार्य करीत नाही. तसेच अभियोग पक्ष तपासीक अधिकारी व इतर स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष अभिलेखावर नोंदवू शकलेला नाही. सदर गुन्ह्यातील जप्ती किंवा तपास प्रक्रियेत स्वतंत्र पंचांची साक्ष विश्वसनीय नाही. जप्तीची कारवाई संशयास्पद ठरते. तसेच आरोपींनी संगणमत करून स्वतःला आर.टी.ओ. विभागाचे कर्मचारी असल्याचे बतावणी करून ट्रक चालकाकडून अवैधरित्या पैशाची वसुली केली, हे सिद्ध होत नाही. यावरून वर नमुद कायद्याअंतर्गत आवश्यक घटक सिद्ध करण्यास अभियोग पक्ष असमर्थ ठरलेला आहे. उपरोक्त बाबींचा विचार करता आरोपींना सदर गुन्ह्यात दोषी धरता येणार नाही. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u>** :–

१३) मुद्दा क्र. १ वरील चर्चेअंती मी या मतास आले आहे की, आरोपी क्र. १ ते ३ व ५ विरुद्ध निशाणी क्र. ३४ वर ठेवलेल्या भारतीय दंड संहिता कलम १७० सहकलम ३४ अन्वये दोषारोप अभियोग पक्षाने संशयाचे पलीकडे जाऊन सिध्द केलेला नाही. म्हणून मी मुद्दा क्र. २ चे उत्तराकरीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## –: आ दे श :–

(१) आरोपी **१] महेश श्रावण खंडाते २] गणेश रामलुन मडावी ३] मोहन दशरथ खंडाते व ५] अब्दुल नईम खान** यांना भारतीय दंड विधान, १८६० चे कलम १७० सहकलम ३४ अन्वये या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

(२) आरोपींचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

(३) सदर गुन्ह्यातील नगदी रू. २०,०२२/– ही अपील कालावधीनंतर सरकार खाती जमा करण्यात यावी.

(४) तसेच जप्त मुद्देमाल ५ मोबाईल हे आदेशान्वये मुळ मालकास सुपुर्तनाम्यावर दिलेले आहेत. अपील कालावधी संपल्यानंतर सदर मोबाईल हे मुळ मालकाने त्यांच्याच ताब्यात ठेवावेत.

(५) आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७–अ प्रमाणे, या निर्णयाविरुध्द अपील झाल्यास त्यातील त्याची उपस्थिती हमी म्हणून प्रत्येकी रु. १५,०००/– रकमेचा जामीन द्यावा. आरोपींनी दिलेला जामीन आजपासून सहा महिन्यापर्यंत वैध राहील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केला)

AMRUTA AVINASH SHIRVALKAR
Digitally signed by AMRUTA AVINASH SHIRVALKAR
Date: 2026.05.14 16:51:17 +0530

रामटेक. (ए. ए. शिरवळकर)
दिनांक : १४/०५/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
रामटेक.

**भाग — क**

**सरकारपक्षाचे साक्षीदार**

| सा.क्रं. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | संजय राजुजी वाघमारे | घटनास्थळ पंच |
| २. | संजय रमेश झाडे | फिर्यादी |

**सरकारपक्षाचा कागदोपत्री पुरावा**

| अ. क्रं. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ३८ | घटनास्थळ जप्ती पंचनाम्यावरील सही |
| २. | ३९ | तोंडी रिपोर्ट |

**बचावपक्षाचे साक्षीदार**

| सा. क्रं. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| .. | .. | .. |

**न्यायालयाने दिलेले निशानी क्रमांक**

| अ. क्रं. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | .. | .. |

**जप्त मुद्देमाल**

| अ. क्रं. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | .. | .. |

AMRUTA AVINASH SHIRVALKAR
Digitally signed by AMRUTA AVINASH SHIRVALKAR
Date: 2026.05.14 16:51:22 +0530

रामटेक.
दिनांक : १४/०५/२०२६.

(ए. ए. शिरवळकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
रामटेक.

| | | |
|---|---|---|
| Case argued on | : | 14/05/2026. |
| Judgment dictated on | : | 14/05/2026. |
| Transcription ready on | : | 14/05/2026. |
| Judgment checked and signed on | : | 14/05/2026. |

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file of judgment are word to word, as per original judgment.

P. C. Nandanwar
(Stenographer Gr.III)